प्रेसनोट दिनांक ०६/१२/२०१७

<u>करोडोचे अमिष दाखवुन फसवणुक करणा-या बनावट बँक खातेदारांना मुंबईतुन केली अटक</u>

जुन ते सब्टेंबर २०१७ दरम्यान चिंचवड, पुणे येथील एका व्यापा-याची ऑनलाईन फसवणुक करण्यात आल्याने चिंचवड पोलीस स्टेशन गु.र.नं-२५३/१७ भा.द.वि कलम ४१९,४२० ४६८,४७१,३४ सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ कलम ६६ (सी) (डी) ,फॉरेनर्स ॲक्ट १९४६ कलम १४ (ए) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्हाची पध्दत आरोपी फेसबुक अकाउंटवर फ्रेंड रिक्वेस्ट पाठवुन समोरचा व्यक्तीने रिक्वेस्ट स्विकारल्यानंतर हर्बल ऑईल खरेदी केल्यानंतर मोठया प्रमाणात नफा मिळेल असे भासवुन ऑईल खरेदी करण्यात सांगत असे, पुढे कंपनी ते ऑईल खरेदी न करता फसवणुक करत असे व मोबाईल, ईमेल अकाउट बंद करीत असत. अशा प्रकारे फिर्यादीस वेगवेगळया बँक अकाउंट वर पैसे भरावयास लावुन फिर्यादीची १,०४,४७,०००/- रु ची आर्थिक फसवणुक केली होती. सदर गुन्हाचा तपासामध्ये दिनांक १०/१०/२०१७ रोजी नवी मुंबई खारघर येथुन नमुद गुन्हयात दोन नायजेरीयन आरोपी नामे Amara Obiasogu @robert spiff @ Frank Age-30 , मुळ राहणार- नायजेरीया, रा. सेक्टर नं-३०, ओवेगांव ता.पनवेल, जि नवी मुंबई, २) Ekene Unachukwu Age-30 Yrs मुळ रा. नायजेरीया, रा. सदर यांना अटक करण्यात आली होती त्यांचा कडुन २० मोबाईल ०२ लॅपटाप राऊटर पेन ड्राईव्ह व सिम कार्ड जप्त करण्यात आले होते. सदरचे आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

सदर गुन्हयाचा तपास करीत असताना गुन्हयात वापरण्यात आलेले बँक खाते व मोबाईल नंबर चैनई येथील असल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यावरुन मोबाईल नंबर सी डी आर चे तांत्रीक विष्लेषण करुन सायबर सेल कडील पथक चैनई येथे जावुन गुन्हयामधील फसवणुक करण्यात आलेली रक्कम चेन्नई मधील सात वेगवेगळया बँक खात्यावर भरण्यात आली होती त्याबाबत चेन्नई येथे बँक खातेदार यांचे पत्यावर जावुन खात्री केली असता सदरचे पत्ते बनावट असल्याने सदर ठिकाणी आरोपी राहत नसल्याचे दिसुन आले. आरोपीबाबत माहिती काढली असता आरोपी हे चेन्नई, केरळ, मुंबई व मिरा रोड/भाईंदर येथे काही कालावधीकरीता येवुन राहत असल्याचे निष्पन्न झाले. त्याप्रमाणे माहिती काढुन मुंबई येथे भेंडीबाजार भागात बिलाई गेस्ट हाऊस येथे आरोपी असल्याचे माहिती मिळाल्याने सायबर सेल गुन्हे शाखा पुणे यांनी सदर ठिकाणी छापा टाकुन खालील आरोपीस दिनांक २७/११/२०१७ रोजी अटक केले. आरोपी नामे १) आशिष मोईद्दीन आशिक उर्फ राजेश बाबु प्रभाकरन, वय-४६ धंदा- गारमेंन्टस् रा. तेलाचेरी, केरळ, २) रेजी पीआर उर्फ किरण सुर्या उन्नीकृष्णन, वय-३६ धंदा- हाऊसक्लीनींग प्रोडक्ट सेलर्स, रा. ऐर्नाकुलम, केरळ, ३) शाहुल अहमद उल्ला हमीद उर्फ रविकुमार रामकुमार वय-३२ , धंदा पत्रकार - वेल्लाचेरी आरएसीएल, रा . अडयार, चेन्नई, आरोपींकडे वरील दोन्ही नावाने (मुळ नाव /उर्फ नाव ) विविध बँकेंचे ४५ चेक बुक, १७ पासबुक, ३७ डेबीट कार्ड, ९ मोबाईल फोन, पॅनकार्ड, मतदान कार्ड, प्रेस कार्ड, १३,४०,०००/- रु रोख रक्कम व २२,१०,०००/- बँक खात्यात रक्कम गोठविण्यात आली आहे. अशी एकुण रक्कम ३५,५०,०००/- रु जप्त करण्यात आली आहे. आरोपींची वेगवेगळया बँकेत एकुण २४ बँक खाती असल्याचे निष्पन्न झाले आहे.

आरोपींनी बनावट नावाने बँक खाते उघडण्यासाठी बनावट पॅन कार्ड व मतदान कार्ड चेन्नई येथे पलानी नावाच्या इसमाकडुन तयार करुन घेतले होते. अटक आरोपी यांचे खात्यातील रक्कम चेक / डेबीट कार्डव्दारे काढुन सुनिल (मुंबई) नावाच्या इसमास सीएसटी किंवा बोरीवली स्टेशन येथे देवुन पुढे सुनिल नायजेरीयन टोळीस देत असल्याचे तपासात निष्पन्न झाले त्यामोबदल्यात सदर आरोपींना (खातेदार ) यांना ४ टक्के दराने रक्कम मिळत होती.

सदरची कामगिरी, मा. पोलीस उपआयुक्त, श्री. सुधीर हिरेमठ ,सपोआ मा. श्री मिलींद पाटील, व.पो.नि राधिका फडके, याचे मार्गदर्शनाखाली पो.नि गजानन पवार, पो.उप नि प्रविण स्वामी, कर्मचारी अजित कु-हे, राजकुमार जाबा, दिपक भोसले, नितेश शेलार, अतुल लोखंडे, शाहरुख शेख, मितेश बिच्चेवार, दिपक माने, संतोष जाधव यांनी केली. सदर गुन्हयाचा पुढील तपास पो नि गजानन पवार, सायबर सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर हे करीत आहेत.